नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०४/०४/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील टोलनाका खुमारी येथे दिनांक ०३/०४/२०२२ चे ०४.०० वा. ते ०४.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– मनिष कुमार श्री. छोटेलाल जाधव वय २५ वर्ष रा. निमसराई जलेसर एटा उंत्तर प्रदेश हा आपला आरजे–११/जिबी– २५३३ क्रमांकाच्या कंटेनर ने जात असतांना समोर ट्रकाची लाईन लागली होती समोरील ट्रक क्र युपी –२५ इटी – ३५८६ चा चालक आरोपीने ट्रक भरधाव वेगाने चालविता समोर जात असतांना अचानक ब्रेक मारले. त्यामुळे फिर्यादीच्या कंटेनरनी समोरील ट्रकला मागुन धडक मारली व मागील येणारा कंटेनर क्र. आर जे–११/ जिबी– ६१२८ याने फिर्यादीच्या कंटेनरला मागुन जोरदार धडक दिली. या अपघातात मागील कंटेनर चा ड्राव्हर मानसिंग ग्यानसिंग वय ५५ वर्ष रा. देहथोरा ता. सिंकदरा जिल्हा आगरा (यु.पी.) हा स्टेरिंग मध्ये फसुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि निशा भुते मो.न. ९८२२५६६१८० या करीत आहे.

## गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील कांद्री वार्ड क्र. ०५ गिरे ले आउट कन्हान येथे दिनांक ०३/०४/२२ चे ०९.३० वा. दरम्यान **बदरूद्दीन हसमूद्दीन अंसारी (मृतक), वय ३७ वर्षे रा. कांद्री वार्ड क्र. ०५ गिरे ले आउट कन्हान** यांची पत्नी सबीना हिच्या सोबत नेहमी मृतक यांच्या घरगुती लहानसहान कारणावरून भांडण व्हायचे. घटनेच्या एका दिवसा पूर्वी मृतक ची पत्नी ही मृतका सोबत घरगुती कारणावरून भांडण करूण तिच्या मुलांसह माहेरी निघूण गेली असता त्यांनी त्यांच्या पत्नी सोबत झगडा भांडण झाल्याच्या राग मनात धरून त्यांच्या राहत्या घरी लोखंडी खिडकीच्या ग्रील ला दोरी बांधून गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– हसमूद्दीन खान, वय ५१ वर्ष, रा. कांद्री वार्ड क्र. ०५ गिरे ले आउट कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक प्रविण चव्हाण मो.क्र. ८४२१४३३९२९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर